# छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका


## पाणी पुरवठा जायकवाडी यांत्रिकी विभाग

फोन क्र. ०२४०-२३३३५३६ ते ४०, २३३१३१५ फॅक्स क्र. ०२४०-२३३१२१३


जा.क्र./मनपा/काअ/पापु/जायां/२०२४/२५२

दिनांक : ०१/१०/२०२४

## दरपत्रक सुचना

**विषय :** छत्रपती संभाजीनगर शहर पाणी पुरवठा योजनेवरील भंगार माल/साहित्याच्या लिलाव करण्यासाठी असलेल्या माल/साहित्यांचा लिलाव ठरविण्यासाठी लिलावकर्त्याची (Auctioner) नियुक्ती करणे बाबत.

उपरोक्त विषयान्वये छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या जायकवाडी व शहर पाणी पुरवठा योजनेवरील असलेले विविध पंपगृह येथील भंगार माल/साहित्याचा लिलाव करण्सास मा.आयुक्त तथा प्रशासक महोदय यांची दिनांक २५/०७/२०२३ रोजी मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुषंगाने विभागा अंतर्गत असलेल्या विविध पंपगृह येथील दि. २३/०७/२०२४ रोजी अखेरच्या फारोळा पंपगृह येथील शिल्लक एकत्रित भंगार माल/साहित्यांचे लिलाव करावयासाठी लिलावकर्त्याची (Auctioner) नियुक्ती करणे आहे.

वरीलप्रमाणे माल/साहित्य लिलाव करण्यासाठी शासकीय मुल्यांकनकर्त्याची नियुक्ती करण्यात आलेली असुन सदरील माल/साहित्याची किंमत निश्चित करण्यात येणार आहे. सदरील निश्चित केलेल्या अंदाजे किंमतीच्या टक्केवारी नुसार (Commission Rate) अनुसार खालीलप्रमाणेच्या अटी व शर्तीप्रमाणे पात्र इच्छुक लिलावकर्ता (Auctioner) यांनी आपले दरपत्रक (Quotation) सर्व आवश्यक त्या कागदपत्रांसह कार्यालय **कार्यकारी अभियंता (यां.), पाणी पुरवठा जायकवाडी यांत्रिकी विभाग, टप्पा क्र.३ ईमारत, तिसरा मजला, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका** या ठिकाणी बंद लिफाफ्यात प्रत्यक्ष किंवा पोस्टाने दिनांक०8 /१०/२०२४ रोजी ०२ वाजेपर्यंत सादर करावेत. यानंतर आलेले दरपत्रक (Quotation) विचारात घेतले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

### ई-लिलाव पद्धतीने विक्री करावयाचे भंगार माल/साहित्य

| Sr. No. | Material | Types of Material | Approx. Weight |
|---|---|---|---|
| 1 | All Types of Valve (Sluice Valve & NRV) | Cast Iron | 6.5 Tonne |
| 2 | Old Pump Assembly | Cast Iron | 7 Tonne |
| 3 | Oil Drum (210 Ltr. Each) | Mild Steel | 202 Nos |
| 4 | Column Pipe & etc. | Cast Iron + Mild Steel | 2 Tonne |
| 5 | Foundation Plate + Shutter etc. | Mild Steel | 3 Tonne |
| 6 | Various Pannel Box | Mild Steel | 1200 Kg |
| 7 | Light Fitting + DO Assembly | Mild Steel + Ceramic | 2 Tonne |
| 8 | Breaker + Electrical Parts | - | 3 Tonne |
| 9 | Motors | Cast Iron + Copper | 6 Tonne |
| 10 | Hand PumpMaterial (Lot-2) | Mild Steel + Galvanized Iron | 28 Tonne |
| 11 | Armoured Cables | PVC + Aluminium | 600 Kg |
| 12 | Reduction Gear Box | Cast Iron | 800 Kg |

Scanned with ACE Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | Bearing | Stainless Steel | 250 Kg |
| 14 | SS Shaft + Sleeves | Mild Steel | 1200 Kg |
| 15 | Capacitors | Aluminium, Ceramic, Plastic Films | 3.5 Tonne |
| 16 | Oil Drum with Contaminated Oil (210 Ltr. Each) | Mild Steel | 14 Nos |
| **Total Material Approx. Weight** | | **65 Tonne & 216 Nos Oil Drums (Empty & Contaminated Oil Content)** | |

## अटी व शर्ती

१) लिलावकर्त्यास केंद्र/राज्य सरकार, सार्वजनिक अंडर टेकिंग/निमशासकीय संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/जिल्हा परिषद इ. साठी ई-लिलाव आयोजित करण्याचा किमान ५ वर्षांचा अनुभव असावा.

२) लिलावकर्त्यास कोणत्याही मागील ३ आर्थिक वर्षात केंद्र/राज्य सरकार, सार्वजनिक अंडर टेकिंग/निमशासकीय संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/जिल्हा परिषद इ.साठी ई-लिलाव आयोजित करुन किमान १ कोटी (एक कोटी) उलाढाल असणे आवश्यक आहे.

३) विविध प्रकारच्या साहित्यांची लिलावाद्वारे विक्री झाल्यानंतर सदर खरेदीदाराने सर्व साहित्य लवकरात लवकर हलविण्याची जबाबदारी आपली लिलावकर्त्याची राहील.

४) सदर साहित्यांची विक्री बाबत जाहीरात आपल्या (लिलावकर्त्याच्या) संकेतस्थळावर करण्याची जबाबदारी लिलावकर्त्याची राहील. तसेच जाहीरात राज्य पातळी वरील सर्वाधीक खप असलेल्या वर्तमान पत्रात करण्याची जबाबदारी लिलावकर्त्याची राहील. (एक इंग्रजी व एक मराठी)

५) सदर लिलावाकरीता आवश्यक ती अनामत रक्कम व मालापोटी भरुन घ्यावयाची अनामत रक्कम डी.डी. ने किंवा रोखीने मनपाच्या लेखा विभागात प्रक्रियेपुर्वी व लिलाव करण्याचा आदेश मिळाल्यानंतर भरणे आवश्यक आहे.

६) साहित्याची विक्री झाल्यानंतर सदर साहित्यांवरील सरकारी कर इ. पुर्तता केल्यानंतरच साहित्य घेऊन जाण्यास परवानगी मिळेल.

७) काही कारणास्तव लिलाव ठरलेल्या तारखेला न झाल्यास/रद्द झाल्यास किंवा काही साहित्य विकले न गेल्यास सदर लिलाव त्वरीत पुढील जवळच्या तारखेला करण्यात येईल. जास्तीत जास्त तीन वेळा सदर लिलाव करण्यात येईल. त्यासाठी ज्यादा मेहंनताना रक्कम दिली जाणार नाही.

८) लिलावाच्या दिवशी सदर मालाच्या खरेदीदारास त्यांनी विकत घेतलेल्या मालाची माहिती देण्यासाठी आवश्यक असलेल्या साधनांसह आपल्या कर्मचाऱ्यांमार्फत व्यवस्था करण्यात यावी.

९) लिलाव प्रक्रियेत महानगरपालिकेचे काही आर्थिक नुकसान झाल्यास सदर रकमेची वसुली लिलावकर्त्याची राहील.

१०) इच्छुक बोलीदारांना कामकाजाच्या वेळेत लिलावाद्वारे विल्हेवाट करावयाचे सूचीबद्ध स्क्रॅप लॉट/भंगार सामग्रीची तपासणी करण्याची परवानगी दिली जाईल आणि स्क्रॅप लॉटच्या तपासणीला लिलावाच्या एक दिवस आधी पर्यंत एकुण कार्यालयीन कामकाजाचे पाच दिवस (कार्यालयीन वेळात) परवानगी दिली जाईल. लिलाव विक्रीच्या तारखेला लॉट पाहणीसाठी परवानगी दिली जाणार नाही.

११) कोणतेही कारण न देता कोणतीही एक किंवा सर्व ऑफर नाकारण्याचे अधिकार छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे असतील.



Scanned with ACE Scanner

१२) लिलावकर्त्याने दोन बंद लिफाफ्यात कागदपत्रे आणि कमिशन रेट सादर करावे.

लिफाफा क्र.१ :-

- पॅन कार्डची स्कॅन प्रत.
- जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्राची स्कॅन प्रत.
- गेल्या ५ वर्षात लिलावकर्त्याने आयोजित केलेल्या केंद्र/राज्य सरकार, सार्वजनिक अंडर टेकिंग/निमशासकीय संस्था/स्थानिक स्वराज्य संस्था/जिल्हा परिषद इ.संस्थेच्या प्रमाणपत्राची/ कामाच्या आदेशाची स्कॅन प्रत.

लिफाफा क्र.२ :-

- कमिशन रेट (लिलाव समितीने निश्चित केलेल्या भंगार माल/साहित्याच्या एकुण रकमेच्या प्रमाणात टक्केवारीनुसार).

**कार्यकारी अभियंता (यां.)**
**पाणी पुरवठा जायकवाडी**
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका

O/C



Scanned with ACE Scanner